महाराष्ट्र शासन

क्रमांक:व्हीएलएस १०८७/(सीआर-३२६१)प्राशि३
शिक्षण व सेवायोजन विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३ ऑगस्ट ~~जुलै~~, १९८७

प्रति,
मुख्याध्यापक,
माऊंट सेंट ॲन, तळेगांव-दाभाडे,
जि. पुणे - ४१०५०७
जि. पुणे

विषय :- माऊंट सेंट ॲन कॉन्व्हेंट प्राथमिक शाळेस परवानगी मिळण्याबाबत.

महोदय,

वरील विषयासंबंधी लिहिलेल्या पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेस तळेगांव-दाभाडे या ठिकाणी जून १९८७ पासून इयत्ता १ ते ३री च्या वर्गासहित इंग्रजी माध्यमाची खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचे योग्य ते आदेश विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे यांना देण्यात आले आहेत. पुढील कार्यवाहीसाठी आपण कृपया त्यांच्याशी परस्पर संपर्क साधावा.

आपला विश्वासू,

(व. ल. फातरपेकर.)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन - VLS 1087/3261/Pri 3.

प्रथम यादी

क्रमांक:व्हीएलएस १०८७/(३२६१)प्राशि-३
शिक्षण व सेवायोजन विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २० जुलै, १९८७

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,

विषय :- जून, १९८७ पूर्वी जुन्या पध्दतीनुसार सुरु असलेल्या अनधिकृत खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

जुन्या पध्दतीनुसार शासनाची पूर्व परवानगी न घेता जून १९८७ पूर्वी सुरु असलेल्या खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याचा प्रश्न कांही काळ शासनाच्या विचाराधीन होता. खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करुन सोबत जोडलेल्या यादीमधील शैक्षणिक संस्थांना, माध्यम प्रत्येक संस्थेसमोर दाखविल्याप्रमाणे, जून १९८७ पासून प्राथमिक शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या अटींवर विना अनुदान तत्वावर "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे.

१) संस्था सदर शाळा विना अनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिकदृष्टया सक्षम असली पाहिजे.

२) संस्थेने शाळेसाठी शासनाने विहित केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली, १९४९ मध्ये विहित केलेल्या अटींनुसार, जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधांची सोय केली पाहिजे. तसेच शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार, विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे. व त्यांना शासनाने विहित केलेल्या दराने वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

३) संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे (वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या, विद्यार्थ्यांचे प्रवेश इत्यादी) काटेकोरपणे पालन केले पाहिजे.

४) संस्थेने नवक्ष्याऱ्याच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणतेही विपरित परिणाम होणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे.

३. ही परवानगी देण्यापूर्वी प्रत्येक संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची खात्री करुन घेऊन मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही

---२/

करण्यात यावी :-

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमाखाली नोंदली आहे.

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] संस्थेने विहीत नमुन्यांत सशुल्क अर्ज केला आहे [यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करुन घ्यावा]

७] शासनाची मंजुरी नसताना प्राथमिक शाळा चालु ठेवल्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १०० दंड संस्थेने कोषागारांत भरला आहे.

तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

४. सदर प्राथमिक शाळेला प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही दिनांक ३१.७.८७ पर्यंत पूर्ण करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास दिनांक ७.८.८७ पर्यंत पाठवावा.

[ व. ल. फातरपेकर ]
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१] शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२] शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद,
३] प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ, तळेगांव-दाभाडे
४] मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव.
५] शिक्षण मंत्र्यांचे खाजगी सचिव.
६] शिक्षण राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव.
७] निवड फाईल.

जिल्हा – पुणे–

| संस्थेचे /शाळेचे नांव<br>१ | ठिकाण व<br>तालुका<br>२ | माध्यम<br>३ | इयत्ता<br>४ |
|---|---|---|---|
| १] पीपल्स एज्यु. सोसा. मुंबई इंग्रजी माध्यम प्रा. शाळा | येरवडा, पुणे–६ | इंग्रजी | १ ते २री |
| २. जनता शिक्षण संस्था पुणे क्लासिन इंग्लिश मिडीयम स्कूल | दापोडी पुणे–१२ | इंग्रजी | १ ते २री |
| ३] डेक्कन एज्युकेशन सोसायटी पुणे–४ | पुणे–४ | इंग्रजी | १ ते ४थी |
| ४] शिवभूमी शिक्षण संस्था, खेड शिवापूर, शिवभूमी विद्यालय. | यमुनानगर निगडी, पुणे. | मराठी | १ ते ५वी |
| ५] विकास तरुण मंडळ विकास विद्यामंदीर | मोहननगर चिंचवड | मराठी | १ ते ३री |
| ६] सरस्वती शिक्षक संस्था, तळेगाव दाभाडे, सरस्वती, विद्यामंदीर | तळेगांव | मराठी | १ ते ३री |
| ७] माउंट सेंट ॲन, तळेगांव, दाभाडे माउंट सेंट ॲन कॉन्व्हेंट स्कूल | तळेगांव दाभाडे | इंग्रजी | १ ते ३री |
| ८] सेंट झेविअर एज्यु. ट्रस्ट, पुणे सेंट झेविअर इंग्लिश मिडियम स्कूल, | चिंचवड | इंग्रजी | १ ते २ री |
| ९] श्री. शिवाजी मराठा सोसायटी पुणे. श्री शिवाजी मराठा प्रा. शाळा | अरण्येश्वर पुणे. | मराठी | १ ली |
| १०] आचार्य श्री. विजय वल्लभ धानी, जैन विद्या प्रसारक मंडळ, पुणे विजय वल्लभ स्कूल | पुणे | इंग्रजी | १ली |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
| --- | --- | --- | --- | --- |
| ११] | वनाज परिवार शिक्षण मंडळ पुणे<br>वनाज परिवार विद्यामंदीर | पौडरस्ता पुणे. | मराठी | १ ते ३ री |
| १२] | पुना वुईमिन्स कौन्सील, पुणे<br>पुना वुईमिन्स प्रा. शाळा | पुणे | इंग्रजी | इ. १ ते ४ थी |
| १३] | ग्रामोन्नती मंडळ, नारायणगांव<br>प्राथमिक शाळा | नारायणगांव | मराठी | १ ली |
| १४] | साने गुरूजी शिक्षण संस्था<br>हडपसर आदर्श विद्यामंदिर | महादेवनगर ता. हवेली | मराठी | १ ली |
| १५] | साने गुरूजी शिक्षण संस्था,<br>हडपसर आदर्श प्राथमिक<br>विद्यामंदीर | ससाणेनगर | मराठी | १ ली |
| १६] | महाराष्ट्र शिक्षण प्रसारक<br>मंडळ धनकवडी पुणे<br>बालविकास मंदिर | पुणे | मराठी | १ ली ते ३ री |
| १७] | महात्मा फुले विद्या<br>निकेतन, ससाणेनगर, पुणे. | ससाणेनगर पुणे. | मराठी | १ ते ३ री |

| | | | |
|---|---|---|---|
| २]राष्ट्रीय शिक्षण मंडळ, अहमदनगर, राष्ट्रीय पाठशाळा. | अहमदनगर | मराठी | १ ते २ री |
| ३]श्रीरामपूर एज्यु. सोसायटी, श्रीरामपूर. प्रा. शाळा. | श्रीरामपूर | मराठी | १ ली |
| ४]महाराष्ट्र सेवा मंडळ, श्रीरामपूर, प्रा. शाळा. | श्रीरामपूर | मराठी | १ ली |
| ५]अहमदनगर, एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर, प्रा. शाळा. | अहमदनगर | इंग्रजी | १ ली |

<u>जिल्हा:- सोलापूर</u>

| | | | |
|---|---|---|---|
| १] बृहन्मठ , होटगी श्री वीर तपस्वी प्राथमिक शाळा | एम. आय. डी. सी सोलापूर. | मराठी | १ ते ५वी |
| २]शाहिद टिपू सुलतान. असोसियशान संस्था, सोलापूर. शाहीद टिपू सुलतान उर्दू प्रा. शाळा. | सोलापूर | उर्दू | १ ते २ री |
| ३]अंजुमन नाफेऊल अकलाफ शिक्षण संस्था, सोलापूर, अंजुमन अकलाफ प्राथमिक शाळा. | शेळगी ता. उत्तर सोलापूर | उर्दू | १ ते ३ री |
| ४]आदर्श नाट्य मंडळ, सोलापूर | स्वागतनगर सोलापूर. | मराठी | १ ते २ री |
| ५]सोलापूर शिक्षण प्रसारक मंडळ, प्राथमिक शाळा. | श्रमजीवी नगर नं३ सोलापूर | कन्नड | १ ते २ री |
| ६]विश्वकर्म शिक्षण मंडळ, मैनेश्वर नगर. | नीलम श्रमजीवीनगर सोलापूर. | कन्नड | १ ते २ री |
| ७]शिक्षणा प्रसारक मंडळ, कुमठे, प्राथमिक शाळा | कुमठे | मराठी | १ ली |
| ८]श्री. सिध्देश्वर देवस्थान, सोलापूर. | सोलापूर | इंग्रजी | १ ते ४ थी |
| ९]सोलापूर शिक्षण प्रसारक मंडळ, | श्रमजीवी नीलमनगर | कन्नड | १ ते २ री |
| १०]वाय. पी. एज्युकेशान सोसायटी बार्शी, आदर्श मराठी शाळा | बार्शी | मराठी | १ ली |
| ११] भारत शिक्षणा प्रसारक मंडळ बार्शी, ता. विद्यामंदिर. | बार्शी | मराठी | १ ते ४ थी |

<u>जिल्हा:- रायगड</u>

| | | | |
|---|---|---|---|
| १]कोकणा एज्यु. सो. पेझारी शाळा | पेझारी ता. अलिबाग | मराठी | १ ते ४ थी |
| २]दी मेट्रोपॉलिटन एज्यु. सोसायटी बॉर्न्स स्कूल. | पनवेल | इंग्रजी | १ ते ७ वी |

-------

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१
यांचे कार्यालय,
दि.

19 NOV 1991

प्रति,

सचिव,
~~दि.सोसायटी ऑफ रिसर्च~~ ऑफ सेंट ॲण्ड;
बॉम्बे.
-------------------

विषय :- सन. १९९१.९२ या शै. वर्षात नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : मा. उपसचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, यांचेकडील पत्र क्र. एसएसएन/१०९१/२८१५/माशि-१ दिनांक ३१ ऑगस्ट. १९९१ चे पत्र.

शासनाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेला नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करून खाली दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून १९९१ पासून विना-अनुदान तत्वावर/कायम विना अनुदान तत्वावर विशेष बाब म्हणून नविन माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवरच परवानगी देण्यांत येत आहे.

[१] या नविन माध्यमिक शाळांना [इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त] शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एसएसएन१०८८/१६६९-एन/माशि-१ दि. १०.२.८९ अन्वये विहित केलेल्या नविन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

[२] सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे [ उदा. विदयार्थ्यांच्या प्रवेशा बाबत इ.] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

[३] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

[४] इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिकदृष्टया मागासलेल्या विदयार्थ्यांसाठी [ इ.बी.सी.च्या ] फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमीपत्र संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे

[५] जादा उघडण्यात आलेल्या तुकडयातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याने देण्यात यावेत तसेच प्रवेशाचे वेळी विदयार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्वीकारण्यात येवू नये.

[६] महाराष्ट्र शैक्षणिक संस्था[प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशनफीज]कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी/वर्गणी विदयार्थ्यांकडून जमा करण्यात येवू नये.

[७] माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती]नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

[८] संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टर प्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात येईल.

[९] शिक्षक/कर्मचारी संच शिक्षणाधिकारी[माध्यमिक] यांचेकडून मंजूर करून घेण्यात येईल.

[१०] माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अदयावत व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

[११] शालेय वातावरण,इमारत,प्रयोगशाळा इ. बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधासह ठेवण्यात येतील.

[१२] माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.२ अन्वये मा.शिक्षण संचालक,यांची पूर्व परवानगी,शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.

इतर अटी :-

१] संबंधित संस्था,मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमा खाली नोंदणी आवश्यक आहे.

२] संस्थे विरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळा पैकी एखादया शाळेची मान्यता काढून घेतली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] ज्या संस्थानां परवानगी आदेश मिळाल्यानंतर शाळा सुरु करणे शक्य होणार नाही. अशा संस्थांनी १९९२-९३ पासून नूतणीकरणा बाबत डिसेंबर ९१ पूर्वी शिक्षणाधिकारी व या कार्यालया मार्फत शासनाकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

त्या बाबी पैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

| अ.न. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम. |
|---|---|---|---|---|
| | दि.सोसायटी ऑफ रिसर्च ऑफ सेंट अण्ड बॉम्बे. | तळेगांव दाभाडे ता.मावळ. | इ.८वी जून ९१ पासून. | इंग्रजी |

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३.१ नुसार शाळा सुरू झाल्यापासून एक महिन्याचे आत विहित प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यतेकरिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पध्दती मधील नियम १ ते १५ पर्यंत विहित केलेल्या नियमा प्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही असे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे-१.

प्रतिलिपी.

शिक्षणाधिकारी[माध्य] जिल्हा परिषद **पुणे** यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित त्यांनी वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देवून पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची तपासणी करून अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा तसेच संस्थे विरुध्द तक्रारी व गैरव्यवहाराची उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्या विषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर नवीन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणा-या अधिका-याकडून तपासणी करून आपल्या अभिप्रायासह तपासणी करून आपल्या अभिप्रायासह तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

२] मा.उपसचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग,मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

३] मा.शिक्षण संचालक,महाराष्ट्र राज्य,पुणे-१ यांना माहितीसाठी सादर.

त्वरीत

जा. क्र. प्रा/प्राशि/मान्यता/पीआर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक 04/AUG. 1987.

प्रति,

शिक्षणाधिकारी
[ प्राथमिक विभाग ]
जिल्हा परिषद पुणे

विषय :- जून १९८७ पूर्वी जुन्या पध्दतीनुसार सुरु असलेल्या अनधिकृत खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. व्हीएलएस ~~१०८७/(३२८७)प्राशि-३~~ दि. चे पत्र
दि-२०.७.८७.

उपरोक्त विषया संबंधीचे आपले कार्यालयास पृष्ठांकितकेलेले शासनाकडील संदर्भित पत्र कृपया अवलोकावे

याबाबत कळविण्यात येते की, खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घातलेल्या सर्व साधारण बंदीला अपवाद करुन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून १९८७ पासून प्राथ. शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विना अनुदान तत्वावर " खास बाब " म्हणून परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नाव | शाळेचे नाव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|
| मार्कर सेंट ॲन तळेगाव दाभाडे. | मार्कर सेंट ॲन कॉन्व्हेंट स्कूल, तळेगाव-दाभाडे. | १ ले ४ थी. | इंग्रजी. |

१] संस्था सदर शाळा विना अनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिक दृष्टया सक्षम असली पाहिजे.

२] संस्थेने शाळेसाठी शासनाने विहीत केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मध्ये विहीत केलेल्या अटीनुसार जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधांची सोय केली पाहिजे. तसेच शाळेसाठी विहीत केलेल्या नियमानुसार विहीत वयोमर्यादित व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहीत केलेल्या दराने वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

३] संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे [ उदा. वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या, विद्यार्थ्यांचे प्रवेश इ. ] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

४] संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणतेही दुष्परिणाम होणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे.

३] ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची खात्री करुन घेऊन मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त, अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमाखाली नोंदली आहे.

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारची गैरव्यवहार चालत असल्या बाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] संस्थेने विहीत नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे. [ यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करुन घ्यावा.

७] शासनाची मंजुरी नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

४] तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा.

स्थळ प्रतीवर शि. उ. सं. पु. वि.
यांची सही आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१ करिता

प्रत :- प्रशासनाधिकारी/महानगरपालिका/ नगरपालिका शिक्षण मंडळ ........ ............... जिल्हा ................. याना माहिती साठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत:- मा. सचिव/ ~~अध्यक्ष~~ ....... मार्कुस सेन्ट ज्यॉन तळेगाव-दाभाडे, जि. पुणे.
.........................................................................
याना माहितीसाठी अग्रेषित.

10th std

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.. शिक्षण माध्यमिक.
शिक्षण/माध्य/ह-४/प्रथम मान्यता/९३-९४.
पुणे, दि. २०/१०/९३.

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
माऊंट सेंट ॲन हायस्कूल, तळेगाव-दाभाडे
ता. मावळ.

विषय :- इ.१०वी वर्गास प्रथम मान्यता. 10th std.

संदर्भ :- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे कडील पत्र क्र. माध्य ३/प्रथम मान्यता/पुणे/९३/२३५७८ 23978
दि. ६/१०/९३

उपरोक्त विषयसंदर्भान्वये आपल्या दि सोसा. ऑफ रिसर्च. बॉम्बे संस्थेव्दारा संचालित ~~मराठी~~/ इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक विद्यालयातील इयत्ता १०वी च्या वर्गास खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षापासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

१] संस्थेने मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करून द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा साहित्य उपलब्ध करून द्यावे.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करून ग्रंथांची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर उपलब्ध करावे.
६] पुरेसा ...... प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करून द्यावा.
७] शैक्षणिक, कार्यानुभव व क्रीडा साहित्य उपलब्ध करून द्यावे.
८] शैक्षणिक साहित्याचा अध्यापनात वापर असावा.
९] स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करून द्यावी.
१०] वाढीव फीचे दर मा. शि. संचालक, म. रा. पुणे यांचेकडून मंजूर करून घ्यावेत.
११] माध्यमिक शाळा संहितेनुसार शालेय रेकॉर्ड असावे.
१२] कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
१३] शिक्षणकांचा भविष्य निर्वाह निधी . खाती उघडावीत.
१४] विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करून घेण्यात यावी.
१५] अभ्यासेतर कार्यक्रम, विविध स्पर्धा व परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग असावा.

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे.

पुणे: यशवंतराव चव्हाण भवन,
[illegible] जिल्हा परिषद, पुणे
[शिक्षण माध्यमिक]
जा. क्र. शिक्षण/माध्य/ह-३/०४-०५

BOOK-POST

दिनांक : २८-१०-२००४.

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
माऊंट सेंट ॲन्स कॉन्व्हेंट स्कूल
तळेगाव दाभाडे
ता. मावळ जि. पुणे

विषय :- मान्यता प्राप्त अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित माध्यमिक शाळामधून नैसर्गिक वाढीच्या व अतिरिक्त तुकडया मंजूर करणे बाबत.....

संदर्भ :- १] शासन निर्णय क्रमांक - मा.शा.अ-१००३/[३८०/२००३]/मा. शि.-१, दिनांक १३ ऑगस्ट २००४

२] मा. शिक्षण संचालक [माध्य. व उच्च माध्यमिक] शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे - १ यांचे क्रमांक अमाशा १००४//२००४-०५/जा. तु. मंजूरी/१५-क व दिनांक ८/९/२००४ चे पत्र

~~३] मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे - १ यांचे क्रमांक~~
दिनांक
~~चे पत्र.~~

उपरोक्त विषय व संदर्भानुसार आपणास कळविण्यात येते की, सन २००१-०२ २००२-०३ व २००३-०४ या शैक्षणिक वर्षामध्ये आपण कार्यालयाकडे सादर केलेले जादा तुकडी मागणीचे प्रस्ताव व कार्यालयामार्फत करण्यास आलेली पटपडताळणी व प्रत्यक्ष कागदपत्रांची केलेली छाननी याचा विचार करुन आपल्या विद्यालयास पुढील प्रमाणे नविन तुकडया त्या समोर दर्शविलेल्या तपशीलप्रमाणे मंजूर करण्यास येत आहेत.

| अ. नं. | इयत्ता | तुकडी क्रमांक | कोणत्याही शैक्षणिक वर्षापासून | जादा/ नैसर्गिक वाढीचे | विनाअनुदानित/ कायम विना अनुदानित |
|---|---|---|---|---|---|
| १. | इ. ८वी | २री | २००३-०४ | जादा प्रवेश | कायमविनाअनुदानित |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |

उपरोक्त तुकडया पुढील अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहेत.

१] विनाअनुदान तत्वावर मंजूर करण्यात आलेल्या तुकडयांना दिनांक १४ जुलै २००० च्या शासन निर्णयातील अनुदान सुत्र किंवा जेव्हा त्या तुकडया अनुदानास पात्र ठरुन अनुदानावर आणल्या जातील त्यावेळी जे अनुदानाचे सूत्र असेल ते लागू राहील.

२] अशा तुकडीस अनुदानाचा हक्क प्राप्त होणार नाही. निधीच्या उपलब्धतेनुसार निकषपात्र तुकडयांना शासन अनुदान लागू करीत असते हे अनुदान भूतलक्षी-प्रभावाने लागू केले जाणार नाही. जेव्हा पासून अनुदान सुरु करण्यात येईल त्यावेळी अशा तुकडयांना ज्या टप्प्यावरील अनुदान देय राहील त्या टप्प्यावरील अनुदान लागू करण्यात येईल, तत्पूर्वीचे कोणतेही अनुदान अनुज्ञेय असणार नाही.

३] नैसर्गिक वाढीव्यतिरिक्त अति - रिक्त तुकडया या केवळ कायम विनाअनुदान-तत्वावरच मंजूर करण्यात आल्या आहेत. अशा तुकडया अनुदानास पात्र असणार नाहीत. ४

४] कायम विनाअनुदान तत्वावरील शाळेच्या नवीन जादा तुकडया कायम विना अनुदान तत्वावरच मंजूर करण्यास आल्या आहेत अशा तुकडया देखील अनुदानास पात्र असणार नाहीत.

जादा मंजूर तुकडयानुसार सेवकसंच मान्य करुन घेणे व नवीन पदावर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता घेणे याबाबत त्वरीत कार्यवाही करुन घ्यावी.

शिक्षणाधिकारी [माध्य.]
पुणे जिल्हा परिषद, पुणे.

जा. क्रं. माध्य-३/प्रथम मान्यता/पुणे विभाग/९९९३
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे- ४११ ००१ यांचे कार्यालय.

दिनांक :- 24 SEP 1993

प्रति,

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद ______________________
पुणे

विषय :- प्रथम मान्यता
मांउट सेंट ॲन कॉन्व्हेंट हायस्कूल तळेगाव दाभाडे

संदर्भ :- आपले पत्र जा. क्रं. शिक्षण/माध्य/ह-४/९२-९३ दिनांक १९.८.९३

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२, ३.३ अन्वये ~~सोसायटी ऑफ सिस्टर ऑफ सेंट ॲन बॉम्बे~~ संस्थेच्या ~~इंग्रजी~~ माध्यमिक शाळेच्या इ. ८वी/९वी/१०वी च्या वर्गास सन १९ ९२ १९ ९३ या शैक्षणिक वर्षासाठी /सन १९ ९१ पासून प्रथम मान्यता/मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्य] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करून पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठविताना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतचा अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१] संस्थेने मालकीची शैक्षणिक दृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करून द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करून द्यावी.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करून दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून द्यावे.
६] पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करून द्यावा.
७] स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करून द्यावी.
८] वाढीव फीचे दर मा. शिक्षण संचालक, म.रा. पुणे यांचेकडून मंजूर घ्यावेत.
९] शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात
१०] कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२] विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३]

सही असे

प्रति,
मुख्याध्यापक
मांउट सेंट ॲन कॉन्व्हेंट हाय.
तळेगाव दाभाडे, पुणे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

जा. क्र. ३८३ दिनांक ३/१०/८९
नगरपालिका शिक्षण मंडळ, तळेगांव दाभाडे
जि. पुणे.

प्रति,
मा. मुख्याध्यापिका,
माऊंट सेंट ॲन,
तळेगांव दाभाडे.

विषयः- मान्य खाजगी प्राथमिक शाळांना नवीन /ज्यादा तुकड्या उघडण्यास मान्यता देण्या बाबत... १९८९=९० .

---

संदर्भः- मा. शिक्षण उप संचालक, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र जा. क्र. प्रा/प्राशि/जातु/पीआर दि. २७/९/१९८९.

मा. शिक्षण उपसंचालक, पु. वि. पुणे यांचे पत्र क्र. प्रा/प्राशि/जातु/पीआर दि. २७/९/१९८९ अन्वये आदेशित केल्याप्रमाणे आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या शाळेस खालील नवीन /ज्यादा वर्गास सन १९८९=९० पासून मान्यता देण्यांत येत आहे.

| अनु क्र. | वर्ग | शेरा. |
|---|---|---|
| १) | इयत्ता ९ वी (प्रथमवर्ग) नैसर्गिक वाढीने. | विना अनुदानीत. |

१/- वरील ~~xxxxxx~~ नवीन वर्गास मान्यता शासनाने विहीत केलेल्या अटी, उदा. ईमारत, योग्य अर्हता प्राप्त शिक्षक, शैक्षणिक साधन सामुग्री, पुरेशी पटसंख्या व सरासरी हजेरीची अट पूर्ण करण्याच्या अटीवर देण्यांत आलेली आहे.

२/- विहीत अटींची पूर्तता होत नसल्यांस मान्यता आपोआप रदद्व होईल व पूनः मान्यतेसाठी फेर प्रस्ताव सादर करावा लागेल. याची कृपया नोंद घ्यावी.

प्रशासन अधिकारी,
न. प. शिक्षण मंडळ, तळेगांव दाभाडे.

प्रतः
१) मा. शिक्षण उप संचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांना त्यांचे वरील संदर्भीय पत्रान्वये माहितीसाठी सादर.....

॥ ज्ञानमयो भव ॥

**नगर परिषद शिक्षण मंडळ, तळेगांव दाभाडे**

ता. मावळ, जि. पुणे–४१० ५०७.

*आर. डी. मुंगसे*
बी. कॉम. (ऑनर्स) बी. एड.
प्रशासन अधिकारी


जा. क्र. : 539      दिनांक : 4/3/89

प्रति,
~~श्री~~ • मुख्याध्यापिका,
माऊंट सेंट ॲन कॉनव्हेंट स्कुल,
तळेगांव दाभाडे •

विषयः- मान्य खाजगी प्राथमिक शाळांना नवीन तुकडया उघडण्यांस मान्यता देण्या बाबत • १९८८=८९ •

---

मा • शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे पत्र क्रमांक प्रा/प्राशि/जा • तु • पीआर दि • २०/२/१९८९ अन्वये आदेशित केल्या प्रमाणे आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या शाळेस सन १९८८=८९ पासून खालील प्रमाणे नवीन तुकडीस मान्यता देण्यांस येत आहे •

| अनुक्र • | तुकडी | शेरा • |
|---|---|---|
| (१) | ईयत्ता ५ वी (प्रथम तुकडी) नैसर्गिक वाढीने | विना अनुदानीत |

२/- वरील प्रमाणे दिलेली मान्यता शासनाने विहीत ~~केले~~ केलेल्या अटींची ( उदा • ईमारत, योग्य अर्हता प्राप्त शिक्षकवर्ग, पुरेशी शैक्षणिक साधनसामुग्री, पुरेशी पटसंख्या व सरासरी हजेरी ई •) पूर्तता करण्याच्या अटीवर देण्यांत आलेली आहे •

३/- वरील अटींची पूर्तता होत नसल्यांस मान्यता आपोआप रद्द होईल व पुनः मान्यतेसाठी फेरप्रस्ताव सादर करावा लागेल याची कृपया नोंद घ्यावी •

(signature)

**Administrative Officer**
**Municipal School Board, Talegaon Dabhade**

प्रतः
१) मा • शिक्षण उपसंचालक, पु • वि • पुणे-१ यांना त्यांचे कडील वरील संदर्भीय पत्रान्वये माहिती साठी सविनय सादर • • • • •

उपरोक्त तुकड्या पुढील अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहेत.

१] विनाअनुदान तत्वावर मंजूर करण्यात आलेल्या तुकड्यांना दिनांक १४ जुलै २००० च्या शासन निर्णयातील अनुदान सूत्र किंवा जेव्हा त्या तुकड्या अनुदानास पात्र ठरुन अनुदानावर आणल्या जातील त्यावेळी जे अनुदानाचे सूत्र असेल ते लागू राहील.

२] अशा तुकडीस अनुदानाचा हक्क प्राप्त होणार नाही. निधीच्या उपलब्धतेनुसार निकषपात्र तुकड्यांना शासन अनुदान लागू करीत असते हे अनुदान भूतलक्षी-प्रभावाने लागू केले जाणार नाही. जेव्हा पासून अनुदान सुरु करण्यात येईल त्यावेळी अशा तुकड्यांना ज्या टप्प्यावरील अनुदान देय राहील त्या टप्प्यावरील अनुदान लागू करण्यात येईल, तत्पूर्वीचे कोणतेही अनुदान अनुज्ञेय असणार नाही.

३] नैसर्गिक वाढीव्यतिरिक्त अति - रिक्त तुकड्या या केवळ कायम विनाअनुदान-तत्वावरच मंजूर करण्यात आल्या आहेत. अशा तुकड्या अनुदानास पात्र असणार नाहीत. ४

४] कायम विनाअनुदान तत्वावरील शाळेच्या नवीन जादा तुकड्या कायम विना अनुदान तत्वावरच मंजूर करण्यास आल्या आहेत अशा तुकड्या देखील अनुदानास पात्र असणार नाहीत.

जादा मंजूर तुकड्यानुसार सेवकसंच मान्य करुन घेणे व नवीन पदावर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता घेणे याबाबत त्वरीत कार्यवाही करुन द्यावी.

शिक्षणाधिकारी [माध्य.]
पुणे जिल्हा परिषद, पुणे.

BOOK-POST

यशवंतराव चव्हाण भवन,
जिल्हा परिषद, पुणे
[ शिक्षण माध्यमिक ]
जा. क्र. शिक्षण/माध्य/ह-३/०५-०६/८८०६
दिनांक : १६-१०-२००५.

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
माऊंट सेंट ॲन्स हायस्कूल,
तळेगांव-दाभाडे ता. मावळ

विषय :- मान्यता प्राप्त अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित माध्यमिक शाळामधून नैसर्गिक वाढीच्या व अतिरिक्त तुकड्या मंजूर करणे बाबत.......

संदर्भ :- १] शासन निर्णय क्रमांक - मा.शा.अ-२००३/[३८०/२००३] मा.शि.-१ दिनांक १३ ऑगस्ट २००४.

२] मा. शिक्षण संचालक [माध्य. व उच्च माध्यमिक ] शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे - १ यांचे क्रमांक अमाशा २००४/ /२००४-०५/जा.तु.मंजूरी/१५-क व दिनांक ०८.०९.२००४ चे पत्र

३] मा. शिसप उपसंचालक, पुणे विभाग पुणे - १ यांचे क्रमांक
दिनांक
चे पत्र.

उपरोक्त विषय व संदर्भानुसार आपणांस कळविण्यात येते की, सन ~~२००१-०२ २००२-०३ व~~ २००४-०५ या शैक्षणिक वर्षामध्ये आपण कार्यालयाकडे सादर केलेले जादा तुकडी मागणीचे प्रस्ताव व कार्यालयामार्फत करण्यास आलेली प्रत्यक्ष पाहणी व प्रत्यक्ष कागदपत्रांची केलेली छाननी याचा विचार करुन आपल्या विद्यालयास पुढील प्रमाणे नविन तुकड्या त्या समोर दर्शविलेल्या तपशीलप्रमाणे मंजूर करण्यास येणे आहेत.

| अ. नं. | इयत्ता | तुकडी क्रमांक | कोणत्याही शैक्षणिक वर्षापासून | जादा / नैसर्गिक वाढीव | विनाअनुदानित/ कायम विना अनुदानित |
|---|---|---|---|---|---|
| १. | ९वी | २री | २००४-०५ | जादा | कायम विना अनुदानित. |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |
| ५. | | | | | |

3093

जा.क्र.प्रा/प्राशि/खाप्राशा/जा.तु./पीआर.
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे -१. यांचे कार्यालय.
दिनांक : 26 MAR 1999

प्रति,

१] शिक्षणाधिकारी [प्राथमिक],
जिल्हा परिषद, पुणे विभाग.

२] प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ. तळेगांव-दाभाडे, जि. पुणे.

३] शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५.

Permission for Extra division Std. IV

विषय : मान्यताप्राप्त अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीच्या जादा तुकडया/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत....

वरील विषयासंबंधीचा आपणांकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळांना त्याचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या नैसर्गिक वाढीच्या प्रथम वर्गास/जादा तुकडीस जून १९९८ पासून अनुदान/विनाअनुदान/कायम विनाअनुदान तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी/नैस. वाढ. | शेरा/मंजूर |
|---|---|---|---|---|---|
| १] | स्नेहवर्धक मंडळाचे बालविकास विद्यालय तळेगांव दाभाडे | इंग्रजी | इ. ३रीची ते ७ वीची प्रत्येकी २री तु. मान्य | नै. वाढ | मंजूर |
| २] | माऊंट सेंट ॲन कॉन्व्हेंट हायस्कूल, विष्णुपुरी, मु.पो. तळेगांव दाभाडे जि. पुणे. | इंग्रजी | इ. ४ थीची २ री तु. मान्य | नै. वाढ | मंजूर |

स्वाक्षरीत शि. व. सं. यांनी
सही करे

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत: माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
१] मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
माऊंट सेंट ॲन कॉन्व्हेंट हायस्कूल,
विष्णुपुरी मु.पो. तळेगांव दाभाडे
जि. पुणे.

**<u>कायम विना अनुदान तत्त्वावर (इंग्रजी माध्यम)</u>**

**पुणे जिल्हा परिषद, पुणे**
यशवतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्रशा/४६७/२०११
पुणे १ दिनांकः- १९ / १०/२०११

**प्रति,**

**मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका**
**माऊंट सेंट ॲन प्रायमरी स्कूल**
**तळेगाव दाभाडे ता. मावळ जि. पुणे**

**विषयः-** कायम विना अनुदान तत्त्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना ज्यादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्या प्रथम/जादा तुकडया/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.

**संदर्भ :-** शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस १००२/(१०००/०२)/प्राशि -३ दि.१४ जानेवारी २००३

उपरोक्त विषयासंबधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रसताव विचारात घेता खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा/नैसर्गिक वाढीचा /वाढीच्या प्रथम/**जादा तुकडया**/वर्ग **जून -२०११---, पासून सन २०११ -१२** या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | माऊंट सेंट ॲन प्रायमरी स्कूल तळेगाव दाभाडे ता. मावळ जि. पुणे | इंग्रजी | २ री ते ७ वी | तिसरी तुकडी | कायम विना अनुदान तत्वावर मंजूर |

**<u>अटी व शर्ती</u>**

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानूसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हततेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असलेची निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

**प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**
**सचिव / अध्यक्ष**
माऊंट सेंट ॲन प्रायमरी स्कूल तळेगाव दाभाडे ता. मावळ जि. पुणे

**कायम विना अनुदान तत्वावर ( इंग्रजीमाध्यम )**

पुणे जिल्हा परीषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन,
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प./शिक्षण/प्राथ./२/कॅष/१०
/खा.प्रा.शा./८०/ दि. २५/०८/२०१०

प्रति,

~~मुख्याध्यापक~~./मुख्याध्यापिका,
माऊंट सेंट ॲन हायस्कूल
तळेगाव दाभाडे, पुणे.

विषय :- कायम विना अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीचा/वाढींच्या प्राथम /जादा तुकडया/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत...

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक-व्ही.एल.एस.-२००२/ (२०००/०२) प्रा.शि.-३ दिनांक १४ जाने.२००३.

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा / नैसर्गिक वाढींचा / वाढींच्या प्रथम/ जादा तुकडया / वर्ग जून २०० पासून सन २०० - २०० या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटींच्या आधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडीवाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | माऊंट सेंट ॲन हायस्कूल, मावळ | इंग्रजी | इ. १ ली | तिसरी तुकडी | मंजूर |

**अटी व शर्ती**

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या आधीन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापनविषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परीसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास / तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणीअंती एकजरी अट नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

(सही) २५.१०.२०१०
शिक्षणाधिकारी. (प्राथमिक)
पुणे जिल्हा परीषद पुणे
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे.

प्रत :माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी रवाना.
१. सचिव / अध्यक्ष

"यशवंतराव चव्हाण भवन"
पुणे जिल्हा परिषद, पुणे.

माध्यमिक शिक्षण विभाग
जा.क्र. जिप/माध्य/ह-४/परवानगी/ ९२-९३.
दिनांक 3/3/93

प्रति,
सचिव,
Society of Sisters of St. Ann Bombay.
Bombay.

विषय- इ. ९वी च्या वर्गास प्रथम मान्यता

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, इ. ८वी च्या वर्गास मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे जा.क्र. माध्य/३(१८) नमाशा/मान्यता/पुवि/९२ दिनांक ९।७।९१(९ अन्वये मान्यता दिलेली आहे. व माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ५.२ नुसार उपरोक्त शाळेस जून १९९२ पासून इ. ९वी च्या वर्गास विना अनुदान तत्वावर खालील अटींच्या पूर्तता करण्याच्या शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे.

१)
२)
३)
४)
५)

स्थळप्रतीवर शि.अ. यांची सही असे.

शिक्षणाधिकारी (माध्य.) करिता
पुणे जिल्हा परिषद, पुणे.

प्रत,
१) मुख्याध्यापक, Mount St. Ann Convent High School, Talegaon Dabhade
Tal - Maval. Dist - Poona.

२) मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१.

पुणे जिल्हा परिषद, पुणे
"शिक्षण विभाग [प्राथमिक]
यशवंतराव चव्हाण भवन"
जा. क्र. जिप/शिक्षण/प्राथ/२/२१/तुमा/२००३
पुणे दिनांक:- ५/३/२००३

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
माउंट सेंट ॲन कॉन्व्हेंट हायस्कूल
विष्णुपुरी, तळेगाव दाभाडे, ता० मावळ, जि० पुणे

विषय:- इंग्रजी माध्यमाच्या "कायम विनाअनुदान तत्वावरील" शासन मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गीक वाढीचा/वाढीच्याप्रथम/जादा तुकड्या/वर्ग उघडण्यास परवानगी देणे बाबत. [माध्यम-इंग्रजी]

संदर्भ:- शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस-१००२/[१०००/०२]/प्राशि-२ दिनांक:- १४ जानेवारी २००३.

वरिल विषयासंबंधिचा आपणांकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळेस त्याचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा/नैसर्गीक वाढीचा/वाढीचा प्रथम /जादा तुकडया/वर्ग जून-२०० पासून सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/नैसर्गीक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | माउंट सेंट ॲन कॉन्व्हेंट हायस्कूल - विष्णुपुरी तळेगाव दाभाडे, ता० मावळ जि० पुणे - | इंग्रजी | इ. पाचवी ते सातवी प्रत्येकी दुसरी तुकडी - | नैसर्गिक | ~~मंजूर~~ नामंजूर |

अटी व शर्ती
==========

१] शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायीक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहीजे.
२] सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतीक सुविधातसेच शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करून नेमला पाहीजे.
३] सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४] शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहीजे.
५] सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही. याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६] सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थी संख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७] तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करणेत येईल.

शिक्षणाधिकारी [प्राथमिक]
जिल्हा परिषद, पुणे-१

जा.क्र.प्रा/प्राशि/खाप्राशा/जा-तु/परिआर/३५८०
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १ यांचे कार्यालय,
दिनांक :- 2 APR 1997

प्रति,

१] शिक्षणाधिकारी [ प्राथमिक ]
जिल्हा परिषद, पुणे विभाग.

२] प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,
------------ ---------------

३] शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ५.

विषय :- मान्यताप्राप्त अनुदानित/विनाअनुदानित/कायम विना अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीच्या जादा तुकड्या/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळांना त्याचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या नैसर्गिक वाढीच्या प्रथम वर्गास/जादा तुकडीस जून १९९६ पासून ~~अनुदान/~~ ~~विनाअनुदान/~~ कायम विनाअनुदान तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडी/नैस.वाढ | शेरा/मंजूर |
|---|---|---|---|---|---|
| १) | माउंट सेंट ॲन्स स्कुल लवळेगांव, जि-पुणे. | इंग्रजी | इ. १ ली | २री- ३. | मंजुर |
| | | | इ. २री | २री- ५. | |
| | | | इ. ३री | २री ३. | |

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १ करिता

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

१] मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
माउंट सेंट ॲन्स स्कूल
लवळेगाव, जिल्हा पुणे

# नगर परिषद शिक्षण मंडळ

## तळेगांव दाभाडे, जि. पुणे - ४१० ५०६.

जावक क्र. : २५१ ते २५२

दिनांक : १०/१२/९०

प्रति,

मुख्याध्यापिका,

माऊंट सेंट ॲन स्कुल,

तळेगांव दाभाडे.

विषय :- मान्य खाजगी प्राथमिक शाळांना नवीन तुकड्या उघडण्यास मान्यता देण्या बाबत सन ९०-९१.

मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे पत्र क्रमांक प्रा/प्राशि/मा तु/ [illegible] दिनांक १२/९ /१९९० अन्वये आदेशित केल्या प्रमाणे आपणांस कळविण्यात येते की, आपल्या शाळेस सन १९९०-९१ पासून खालील प्रमाणेच्या नवीन तुकडीस मान्यता देण्यात येत आहे.

| अनु क्र. | शाळेचे नांव | इयत्ता ज्याचा तुकडी नैसर्गिक वाढ. | शेरा |
|---|---|---|---|
| १. | माऊंट सेंट ॲन, तळेगांव दाभाडे. | इयत्ता ७ वी ([illegible]) नैसर्गिक वाढीने | विनाअनुदानीत |

१/- वरील प्रमाणे दिलेली मान्यता शासनाने विहीत केलेल्या अटींची पूर्तता ( उदा. इमारत, योग्य अर्हता प्राप्त शिक्षकवर्ग, पुरेशी शैक्षणिक साधनसामुग्री, पुरेशी पटसंख्या, सरासरी हजेरी, इत्यादी) पूर्तता करण्याच्या अटीवर देण्यात आलेली आहे.

२/- वरील अटींची पूर्तता होत नसल्यास मान्यता आपोआप रद्द होईल. व पुनः मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावा लागेल.

कृपया याची नोंद घ्यावी.

प्रत,

१) मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांना त्यांचे कडील वरील संदर्भीय पत्रान्वये माहिती साठी सविनय सादर....

11/1/96

Headmistress
Mount St. Ann Primary School
Telegaon Dabhade
Pune-410 507.

महाराष्ट्र शासन - VLS 1087/3261/Pri 3.

प्रथम यादी

क्रमांक:व्हीएलएस १०८७/(३२६१)प्राशि-३
शिक्षण व सेवायोजन विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २० जुलै, १९८७

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,

विषय :- जून, १९८७ पूर्वी जुन्या पद्धतीनुसार सुरु असलेल्या अनधिकृत खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

जुन्या पद्धतीनुसार शासनाची पूर्व परवानगी न घेता जून १९८७ पूर्वी सुरु असलेल्या खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याचा प्रश्न कांही काळ शासनाच्या विचाराधीन होता. खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करुन सोबत जोडलेल्या यादीमधील शैक्षणिक संस्थांना, माध्यम प्रत्येक संस्थेसमोर दाखविल्याप्रमाणे, जून १९८७ पासून प्राथमिक शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विना अनुदान तत्वावर "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे.

१) संस्था सदर शाळा विना अनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिकदृष्टया सक्षम असली पाहिजे.

२) संस्थेने शाळेसाठी शासनाने विहित केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली, १९४९ मध्ये विहित केलेल्या अटींनुसार, जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधांची सोय केली पाहिजे. तसेच शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार, विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे. व त्यांना शासनाने विहित केलेल्या दराने वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

३) संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे (वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या, विद्यार्थ्यांचे प्रवेश इत्यादी) काटेकोरपणे पालन केले पाहिजे.

४) संस्थेने नवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणतेही विपरित परिणाम होणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे.

३. ही परवानगी देण्यापूर्वी प्रत्येक संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची खात्री करुन घेऊन मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही

..2/

<u>अत्यंत तातडीचे.</u>

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
शिक्षण विभाग,
जा.क्र.शिक्षण/प्राथ/२/७३०/८७
पुणे-१, दिनांक १८/८/१९८७.

प्रति,

मा. जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,
पुणे.

<u>विषय :- शासकीय परवानगी नसलेल्या खाजगी प्राथ.शाळांची माहिती.</u>

महोदय,

या कार्यालयाने जा.क्र.शिक्षण/प्राथ/२/७२७/८७ अन्वये पुणे जिल्ह्यातील ज्या खाजगी प्राथ.शाळा अनधिकृतपणे चाललेल्या आहेत. त्याची यादी प्रसिध्दीसाठी दिली होती. परंतु शासनाकडील पत्र क्र.शिक्षण व सेवायोजन विभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्र.व्हीएलएस/१०८७/३२६१/प्राशि/३/८७, दि.२०.७.८७ अन्वये खालील प्राथ.शाळांना मंजूरी दिलेली आहे. तरी खालील प्राथ.शाळांना मंजूरी आली असल्याने सदरच्या शाळा अधिकृत शाळा समजण्यात याव्यात व याबाबत प्रसिध्दी देण्यात विनंती आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | संस्थेचे नांव | माध्यम | वर्ग-इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १] | माऊंट सेंट ॲन कॉन्व्हेंट स्कूल, तळेगांव-दाभाडे. | दि सोसायटी ऑफ सिस्टर्स, मुंबई. | इंग्रजी | १ ते ४ |
| २] | शिवभूमी विद्यालय, यमुनानगर, निगडी.पुणे. | शिवभूमी शिक्षण मंडळ, खेड शिवापूर. | मराठी | १ ते ५ |
| ३] | विकास विद्यामंदीर, विकास तरुण मंडळ, चिंचवड. | विकास तरुण मंडळ, मोहननगर, चिंचवड. | मराठी. | १ ते ३ |
| ४] | जनता शिक्षण संस्था, दापोडी. | पुणे ब्लॉसम इंग्लीश मिडीयम स्कूल. | ~~मराठी.~~ इंग्रजी | १ ते २ |
| ५] | वनाज परिवार शिक्षण मंडळ, पुणे. | वनाज परिवार शिक्षण मंडळ, कोथरुड. | मराठी. | १ ते ३ |
| ६] | आचार्य श्री वल्लभ राजस्थानी जैन-विद्या प्रसारक मंडळ, भवानी पेठ, पुणे. | आचार्य श्री.वल्लभ राजस्थानी जैन प्रसारक. | इंग्रजी. | १ ली. |
| ७] | डेक्कन एज्यु.सोसा.पुणे. | डेक्कन एज्यु.सोसा. | इंग्रजी. | १ ते ४ |
| ८] | पिपल्स एज्यु.सोसायटी, मुंबई. | पी.ई.एज्यु.स्कूल.येरवडा.पुणे. | इंग्रजी. | १ ते २ |

तरी वरील शाळा हया अधिकृत शाळा असल्याबाबत प्रसिध्दी द्यावी, ही विनंती.

आपला विश्वासु,

OC signed by